सकाळ

# विद्यापीठ संघाला नेमबाजीत सुवर्ण

कोल्हापूर, ता. २७ : डॉ. कर्णी सिंह शूटिंग रेंज, नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने १० मीटर पिप साईट प्रकारामध्ये सुवर्णपदक पटकावले. यामध्ये प्रतीक जोग (६२८.८), सुमेध सासणे (६२८.१) व आदित्य साळुंखे (६२६.८) यांनी एकत्रित १८८१.६ गुण कमावत सुवर्णपदक पटकाविले.

पंजाब युनिव्हर्सिटी १८७२ गुणांसह द्वितीय क्रमांकावर व चौधरी चरण सिंह युनिव्हर्सिटी मेरठ १८७०.३ गुणांसह तृतीय क्रमांकवर राहिली. प्रतीकला प्रशिक्षक विनय पाटील यांचे, आदित्य याला राधिका हवालदार यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विजय रोकडे यांचे सहकार्य लाभले.



प्रतीक जोग



आदित्य साळुंखे

तरुण भारत



वाराणसी : खेलो इंडिया यूनिव्हर्सिटी गेम्स कुस्ती स्पर्धेत ५० किलो वजन गटामध्ये सुवर्णपदकाची कमाई केलेल्या नेहा चौगलेसोबत प्रशिक्षक दादासो लवटे.

# 'खेलो इंडिया यूनिव्हर्सिटी गेम्स' कुस्ती स्पर्धेत नेहा चौगलेला सुवर्ण

मुरगूड : येथील लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय साई कुस्ती संकुल व सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड व डोर्फ केटल ग्रुपची दतक कुस्तीगीर नेहा चौगले हिने वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया यूनिव्हर्सिटी गेम्स कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत ५० किलो वजन गटांमध्ये सुवर्णपदकाची कमाई केली. शिवाजी विद्यापीठाला पहिल्याच दिवशी सुवर्णपदकाची ही कमाई झाली. विशेष म्हणजे, नेहाचे कारकिर्दीतील वरिष्ठ गटातील हे पहिले सुवर्णपदक आहे.

जीएनडीयू विद्यापीठ हरियाणाच्या आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या मनीषाला नेहाने एकेरी पट काढून भारंदाज हा डाव मारून १२–० विजय मिळवत विजयी सलामी दिली. यानंतर पुढील लढतीत नेहाने पंजाबच्या एलपीयु विद्यापीठची मनप्रीत कौरवर ०६–०२ ने विजय मिळवला. यानंतर झालेल्या पुढील लढतीत नेहाने विजयी लय कायम राखताना हरियाणाच्या पीयुपी विद्यापीठाच्या सविता मलिकला पराभूत करण्याची किमया केली.

यानंतर झालेल्या उपांत्य फेरीतील लढतीत नेहाने एमडीएम विद्यापीठाच्या रोहतकला १२–०० असे नमवत अंतिम फेरीत प्रवेश केला. सुवर्णपदकासाठीच्या लढतीमध्ये नेहाची गाठ हरियाणाच्या जेएनडीयु विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त मनिषा बरोबर पडली. नॉर्डिक पद्धतीने म्हणजेच या गटात सात खेळाडू असल्याकारणाने या पद्धतीचा वापर केला जातो म्हणूनच नेहाने मनीषाला पहिल्या फेरीत पराभूत करूनही क्रॉस सेमी फायनलला मनीषा विजयी झाल्याने पुन्हा अंतिम फेरीत नेहा बरोबर लढत झाली. अटीतटीच्या लढतीत पहिल्या फेरीचा नेहाने विजयाचा फायदा उठवत मनीषाला झोळी या डावावरती चितपट करून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच दादासो लवटे, वस्ताद सुखदेव येरुडकर, शिवाजी विद्यापीठ टीम कोच डॉ. महेंद्र कदम–पाटील, डॉ. ए. वन. आवळे, दयानंद खतकर, सागर देसाई यांचे मार्गदर्शन तर खासदार संजय मंडलिक, विरेंद्र मंडलिक, साईचे राज्य समन्वयक चंद्रकांत चव्हाण, कार्यवाह आण्णासो थोरवत, डॉ. प्रशांत आवणी, जय शिवराय एज्युकेशन सोसायटी, जिल्हा तालीम संघ यांचे प्रोत्साहन मिळत आहे.

लोकमत

# महावीर अध्यासनास अभिजित शिरगुप्पे यांची देणगी

कोल्हापूर : जयसिंगपूर येथील प्राचार्य अशोक शिरगुप्पे यांचे चिरंजीव अभिजित शिरगुप्पे यांनी भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शनिवारी ११ हजार रुपयांची देणगी दिली. सकारात्मक विचाराचे चिंतन तसेच स्वातंत्र्यसेनानी कुटुंबाचा वारसा असणारे शिरगुप्पे यांनी सांगली हायस्कूल येथे प्राचार्य म्हणून काम केले आहे. जयसिंगपूर कॉलेजच्या शाळा समितीचे ते सदस्य आहेत.

दातृत्वाचा हा वारसा नव्या पिढीतील अभिजित यांनीही सांभाळला असून, त्यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अभिनंदन केले. भगवान महावीर अध्यासनाच्या भव्य इमारत बांधकामास सर्व दानशूर, अहिंसाप्रेमी व्यक्ती व संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन विद्यापीठातील महावीर अध्यासनाचे प्रमुख डॉ. विजय ककडे यांनी केले. ही देणगी आयकर सवलतीस शंभर टक्के पात्र आहे. ही देणगी ऑनलाइन व स्कॅन कोडने देण्याची सुविधा उपलब्ध आहे.